# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन

**दिनांक ०७ ऑगस्ट, २०१९**

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या युगात ग्रामीण विद्यार्थी स्पर्धा परीक्षेमध्ये शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत कुठेही मागे राहू नये. त्या संदर्भात योग्य मार्गदर्शन त्यास लाभावे या उद्देशाने महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने विविध मार्गदर्शनपर कार्यक्रम घेतले जातात. या सत्राच्या सुरूवातीला दिनांक ०७ ऑगस्ट,२०१९ रोजी या सेलच्या वतीने सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेकरिता एकूण ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये कला शाखेतून ६० तर वाणिज्य शाखेतून १५ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब

## रासेयो च्या वतीने क्रांतीदिन कार्यक्रमाचे आयोजन

**दिनांक ०९ ऑगस्ट, २०१९**

इंग्रजाच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी ज्यांनी प्राणांचे बलिदान दिले त्यांना आठवण्याचा दिवस म्हणजे ०९ ऑगस्ट, अर्थात क्रांतीदिन ! महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने व प्राचार्य डॉ. केशवराव फाले यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०९ ऑगस्ट २०१९ रोजी 'क्रांतीदिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाकरिता अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथील प्रा. डॉ. अजय लाड हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. रामचंद्र बुटले यांनी स्वीकारले होते.

प्रमुख अतिथीनी आपल्या भाषणाच्या सुरूवातीलाच स्वातंत्र्यलढयाची मशाल पेटवत देशातून इंग्रजी राजवटीला नेस्तनाबूत करण्याची हाक देणाऱ्या तमाम क्रांतीवीरांना अभिवादन केले. यावेळी त्यांनी स्त्रीशक्तीचे महत्त्वही विशद केले. क्रांतीची सुरूवात एका स्त्रीने केली असून या निमित्ताने स्त्री चेतना जागृतीचे आव्हानही केले. याकरिता त्यांनी अरूणा असफल्लीचे उदाहरण विद्यार्थ्यांसमोर ठेवले. अध्यक्षीय भाषणात डॉ. बुटले यांनी रासेयो च्या वतीने राबविता येतील अशा विविध उपक्रमाची माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. नंदकुमार भाकरे यांनी सूत्रसंचालन कु. मयुरी राठोड बी.ए. भाग.१ या विद्यार्थीनीने तर आभार प्रा. प्रकाश तेलगोटे यांनी मानले. या कार्यक्रमाकरिता बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## : कार्यक्रमाची छायाचित्रे :




रासेयो च्या वतीने आयोजित ‘क्रातीदिन’ कार्यक्रम प्रसंगी आपले विचार मांडताना मा. प्रा. डॉ. अजय लाड




रासेयो च्या वतीने आयोजित ‘क्रातीदिन’ कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षीय भाषण करताना डॉ. रामचंद्र बुटले.